महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD , PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 /

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

जा.क्र पुविमं / माध्य शाखा क./212
पुणे–411005
दिनांक : 08 / 01 / 2026

प्रति,

मुख्यध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा ,
जिल्हा–पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

विषय : फेब्रु–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेकरिता उपस्थिती मधील तूट (Deficiency in Attendance) क्षमापित करणेबाबत.

संदर्भ : जावक क्र.रा.मं/परीक्षा–८/४५१०, दि. ०१/०१/२०२६ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने सर्व माध्यमिक शाळा मुख्याध्यापक यांना कळविण्यात येते की, मंडळामार्फत फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणारी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा **दिनांक २०/०२/२०२६ ते दिनांक १८/०३/२०२६** या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेली आहे.

**मंडळ नियमावलीतील नियम क्रमांक ८८ व ४१ मधील तरतुदीनुसार नियमित विद्यार्थ्यांची प्रथम व द्वितीय सत्रातील हजेरी स्वतंत्रपणे ७५% टक्के असणे आवश्यक आहे. प्रथम सत्रातील हजेरी शैक्षणिक वर्षात शाळा सुरू झाल्यापासून दिनांक १५ ऑक्टोंबर २०२६ पर्यंत व द्वितीय सत्रातील हजेरी ही दिनांक १६ ऑक्टोंबर २०२६ ते ०५/०२/२०२६ अखेर पर्यंतच विचारात घ्यावयाची आहे.**

**नियमानुसार ज्या विद्यार्थ्यांची दोनही सत्रातील हजेरी प्रत्येकी ७५% टक्क्यांपेक्षा कमी असल्यास असे प्रस्ताव सोबत दिलेल्या तक्त्यामध्ये आवेदनपत्र रद्द असा स्पष्ट उल्लेख करून पाठविण्यात यावेत. सदर ७५% टक्क्यांपेक्षा कमी हजेरी असलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे विद्यार्थ्यांना देण्यात येऊ नयेत. सदर प्रवेशपत्रे शाळेने त्वरित मंडळाकडे जमा करावीत.**

ज्या विद्यार्थ्यांची दोनही सत्रातील हजेरी स्वतंत्रपणे ६०% टक्केपेक्षा जास्त परंतु ७५% टक्केपेक्षा कमी असल्यास वैद्यकीय कारणास्तव अथवा विद्यार्थ्यांच्या नियंत्रणाबाहेरील परिस्थिती असे सबळ कारण असेल तरच प्रस्ताव आपल्या स्पष्ट शिफारशीसह हजेरी क्षमापित करण्याकरिता कार्यालयाकडे पाठविण्यात यावेत. (योग्य त्या सर्व कागदपत्रासहित)

सदर आवेदनपत्र रद्द **दिनांक ०५/०२/२०२६ नंतर** सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावाला विद्यार्थ्यांचे नैसर्गिक आपत्तीचे कारण वगळता इतर कारणांकरिता प्रति विद्यार्थी दंडात्मक शुल्क रूपये १,०००/– शाळांना आकारण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

**अतिमहत्वाचे – मंडळ नियमावलीतील नियम ४१ अन्वये आवेदनपत्र रद्द करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे त्वरित मंडळ कार्यालयाकडे सुपूर्त करण्यात यावीत. शाळेकडून अपात्र विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे विद्यार्थ्यांना दिली जाणार नाहीत याची दक्षता शाळेने घ्यावी. असे अपात्र विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मुख्याध्यापक यांची राहील.**

सोबतच्या तक्त्यात नमूद केल्यानुसार विद्यार्थ्यांची माहिती भरून तक्ता व पत्र सादर करण्यात यावे.

MBRaut 8.1.26
(मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,(प्र)
पुणे विभागीय मंडळ, पुणे.

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी –

1. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे – ४११ ००१
2. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे/अहिल्यानगर/सोलापूर

Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,
१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर
रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

क्रमांक रा.मं./परीक्षा-८/ 4590
पुणे - ४११ ००४
दिनांक - /१२/२०२५
01/01/2026

प्रति,

मा. विभागीय अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

विषय :- फेब्रु–मार्च २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेकरिता उपस्थिती मधील तूट (Deficiency In Attendance) क्षमापित करण्याच्या अधिकाराबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, फेब्रुवारी–मार्च २०२६ मध्ये होणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा दि. १०/०२/२०२६ ते दि. १८/०३/२०२६ व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा दिनांक २०/०२/२०२६ ते दि. १८/०३/२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

मंडळ नियमावलीतील नियम क्रमांक ८८ व ४१ मधील तरतूदीनुसार विद्यार्थ्यांच्या ६० % ते ७५ % पर्यंतच्या हजेरीतील तूट (Deficiency In Attendance) क्षमापित करण्याचे अधिकार विभागीय मंडळाच्या मा. विभागीय अध्यक्ष यांना आहेत. तसेच ५० % ते ६० % पर्यंतच्या हजेरीतील तूट क्षमापित करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, राज्य मंडळ यांना आहेत.

परंतु विद्यार्थ्यांच्या हजेरीतील तूट क्षमापित करण्याचे प्रस्ताव राज्य मंडळाकडे पाठविण्यास विभागीय मंडळांना अल्प कालावधी रहात असल्याने व हजेरीतील तूट क्षमापित करण्याबाबत निर्णय त्वरीत होण्याच्या दृष्टीने वेळच्यावेळी निर्णय व्हावेत, तसेच विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये म्हणून सदर अधिकार फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या इ.१०वी व इ.१२वी परीक्षांपुरतेच विभागीय अध्यक्ष यांना प्रदान करण्यात येत आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करावी मात्र याबाबत कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

तसेच हजेरीसंदर्भातील ज्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे रद्द (No Candidate) करण्यात आली आहेत. त्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे विभागीय मंडळ कार्यालयात जमा करण्यासंदर्भात संबधीत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना सूचना द्याव्यात. आवेदनपत्र रद्द करण्यात आलेल्या (No Candidate) विद्यार्थ्यास प्रवेशपत्र दिल्यामुळे न्यायालयीन प्रकरणे/गैरप्रकार उद्‌भवणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

५० % ते ६० % दरम्यानची उपस्थिती क्षमापित केलेल्या विद्यार्थ्यांचा अहवाल एकत्रितपणे निर्धारित प्रपत्रामध्ये राज्य मंडळाकडे सादर करावा.

आपला विश्वासू

Digitally signed by
DIPAK AMBADAS MALI
Date: 31-12-2025
17:36:39

(डॉ.दिपक माळी)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४